।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229574
Ext. No. 143,153

**POST GRADUATION SECTION**

Website: srtmun.ac.in
E-mail:dr.pg.srtmun@gmail.com

संदर्भ :पदव्युत्तर/खुल्याप्रवर्गातीलआरक्षण/२०२१–२२/941 दिनांक : ०९/०६/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षण व औषधीनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड.

**विषय : खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरिता आरक्षित १० टक्के Over and Above जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करून घेण्याबाबत.**

**संदर्भः– १. क्रं.बी.एड–३४२१/प्र.क्रं.५१/सीईटीसेल/**
**२. विधी–२०२०/प्र.क्र८६/मशि–२, दि. ३१ मे २०२१**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार मा. प्र. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये आपणास सविनय कळविण्यात येते की, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरिता आरक्षित १० टक्के Over and Above जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करून घ्यावे व तसा कार्यवाही अहवाल शासनास सादर करावा असे उपरोक्त संदर्भ क्रं. ०१ व ०२ अन्वये कळविण्यात आले आहे. सदरील पत्राच्या प्रती सुलभ संदर्भास्तव या सोबत जोडलेल्या आहेत.

कृपया या अनुषंगाने कार्यवाही करावी व सदरील अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यावर त्वरीत अहवाल पदव्युत्तर विभागास सादर करावा जेणे करून शासनास कार्यवाही अहवाल सादर करता येईल, हि विनंती.

आपला विश्वासू

PAKunwar

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

कुलसचिवांचे कार्यालय
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आवक क्र. 760
दिनांक 31/05/2021

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**

फोन नं. ०२०/२६०५१५१२ Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र.बी.एड-३४२१/प्र.क्र.५१ /सीईटीसेल/ दिनांक :

पदव्युत्तर विभाग
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,
नांदेड-४३१६०६
आवक क्र. 456 दिनांक 03/6/2021

प्रति,

१. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय : खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता आरक्षित १० टक्के Over and Above जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करुन घेण्याबाबत . . .**

संदर्भ : शासनपत्र क्र. विधी-२०२०/प्र.क्र.८६/मशि-२, दिनांक ३१.०५.२०२१

उपरोक्त विषयांकित प्रकरणाबाबतच्या संदर्भीय शासनपत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन तसा अहवाल शासनास व संचालनालयास तात्काळ सादर करावा.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

PA Seeliml Spl-Cell
31.5.21

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : विधी-२०२०/प्र.क्र.८६/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २०२१.

प्रति,

कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय** : खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता आरक्षित १० टक्के Over and Above जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करुन घेण्याबाबत...

**संदर्भ** : (१) घटना दुरुस्ती कायदा २०१९.
(२) सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F,No.२००१३/०१/२०१८-BC-II, दि. १७.०१.२०१९.
(३) मानव संसाधन विकास मंत्रालय नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F,No. १२-४/२०१९-U१, दि. १७.०१.२०१९.
(४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२.०२.२०१९.
(५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/वि.शि.-३, दि. ०८.०३.२०१९.
(६) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F,No. Regl०११/१९/२०१९-US(Regulation)-HQ, दि. ०८.०७.२०१९.
(७) भारतीय विधिज्ञ परिषद नवी दिल्ली यांचा आदेश, दि. २९.०७.२०१९.

संसदेने संविधानात १०३ वी घटना दुरुस्ती कायदा, २०१९ पारीत केला आहे. त्यामध्ये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांखेरीज अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये १०% पर्यंत जागा आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार केन्द्र शासनाच्या सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाने व मानव संसाधन विकास मंत्रालयाने सदर १०% जागा संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्वमान्यतेने Over And Above आरक्षित ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

त्यानुसार राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने दिनांक ८.७.२०१९ च्या पत्रान्वये शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी, 10% of Reservation for EWS would be operational from the Academic

year 2019-20 without affecting the percentage reservations of SC/ST/OBC/General, असे कळविले आहे.

त्याचप्रमाणे, भारतीय विधिज्ञ परिषदेने दिनांक २९.०७.२०१९ च्या आदेशान्वये विधी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी, to reserve 10% seats for the Economically Weaker Sections over and above its annual permitted strength in lines of the decision taken by the Government of India, असे कळविले आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १०% आरक्षण विहित केले आहे. तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय व इतर संबंधित विभागांनी निर्गमित करावे, असे निर्देश दिले आहे. त्यानुसार या विभागाने दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांच्या प्रवेशासाठी जागा आरक्षित ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

३. केन्द्र शासनाचे, संबंधित शिखर संस्थेचे व राज्य शासनाचे आदेश/निर्देश विचारात घेऊन, शासन पत्र दिनांक २३.०७.२०२० अन्वये, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण) शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता १० टक्के जागा Over and Above आरक्षित ठेवण्याबाबत संचालक उच्च शिक्षण पुणे यांना कळविण्यात आले. त्यानुसार संचालक उच्च शिक्षण पुणे यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश प्रक्रियेत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता १० टक्के जागा Over and Above आरक्षित ठेऊन, प्रवेश देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यापीठांनी सदर आरक्षित जागांवरील प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करुन घेणे आवश्यक आहे.

४. सबब, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण) शैक्षणिक संस्थांमधील १० टक्के Over and Above आरक्षित जागांवर प्रवेशित खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांचे नामांकन करुन घेण्यात यावे, व तसा कार्यवाही अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

द. रा. कहार

( द. रा. कहार )

शासनाचे उप सचिव,

प्रत,

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.